| | |
|---|---|
| MHKO110023602021 | **कौट्रंबिक हिंसाचार अर्ज क्रमांक ४४/२०२१ मधील निशाणी क्र. ०८ वरील आदेश** **(श्रीमती वहिदा सलीम मुल्ला विरुध्द श्री .दिलावर युसूफ मुल्ला वगैरे ४ )** |

वि.प.यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला " म्हणणे नाहीचा " आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वि.प. यांचा अर्ज व अर्जदार यांनी निशाणी क्र ०९ वर म्हणणे वाचले.

**३.** वि.प. यांचे असे कथन आहे की , सदर कामी वि.प. यांनी मुदतीत मुळ अर्जास व अंतिरिम पोटगी अर्जास म्हणणे अदयाप दाखल केले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द म्हणणे नाही असा आदेश झालेला आहे . परंतू सदरचा विलंब हा त्यांनी जाणीवपूर्वक केलेला नसून आवश्यक कागदपत्रे विहीत मुदतीत मिळाले नसल्यामुळे झालेला आहे . सदरचा अर्ज मंजूर झालेस अर्जदार यांना कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नामंजूर झालेस त्यांचे कधीही पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब त्यांनी अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

**४.** अर्जदार यांनी सदर अर्जास निशाणी क्र . ०९ वर म्हणणे देऊन विरोध केलेला आहे . अर्जदाराच्या मते अर्जातील कथने चुकीची व दिशाभूल करणारी आहेत . तसेच पुरेशी संधी असूनदेखिल वि .प. यांनी नमूद वेळेत त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही . त्याचप्रमाणे अर्जात नमूद केलेले कारण देखिल मोघम स्वरुपाचे आहे. सबब त्यांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केलेली आहे. याउपर अर्ज मंजूर करणेचे झाल्यास वि.प. यांच्यावर रककम रुपये ३०००/- खर्च ठेवणेची विनंती केलेली आहे.

**५.** अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा वि .प. यांचेविरुध्द महीलांचे कौटुंबीक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ अन्वये दाखल केलेला

आहे. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, वि.प.यांचेविरुध्द म्हणणे नाहीचा आदेश पारीत झालेला नाही . परंतू कायदयामधील गृहीतकानुसार वि.प.यांनी म्हणणे मुदतीत दाखल न केल्यामुळे म्हणणे नाही असा आदेश झाल्याचे गृहीत धरुन वि.प.यांना म्हणणे दाखल करणेस परवानगीची आवश्यकता आहे. या निकषावर प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित करणेत येत आहे. अर्जदार यांनी वि.प.यांचे विरोधात केलेल्या आरोपांबाबत वि.प. यांचे म्हणणे घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसारदेखिल वि.प. यांना त्यांचे म्हणणे मांडणेची संधी देणे आवश्यक आहे . सदरचा अर्ज मंजूर केलेस अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट सदर अर्जाच्या अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वि.प. यांनी म्हणणे दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वि.प. यांना त्यांनी केलेल्या उशीरासाठी काही अंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते . सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**- आ दे श -**

**१)** वि.प.यांचा निशाणी क्र. ०८ वरील अर्ज, अर्जदार यांना खर्चादाखल रक्कम रुपये ५००/-(अक्षरी रुपये पाचशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** वि.प. यांनी खर्चाची रक्कम अर्जदार यांना अदा केल्यानंतर त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2023.07.24 12:35:24 +0530

ठिकाण – पेठ वडगांव ( एस.डी.शिरसाट )

दिनांक - २१.०७.२०२३ दुसरे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

पेठवडगांव